# ग्रामीण अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरण व उदारीकरणाचे परिणाम

**डॉ. डी. व्ही. पवार**
उपप्राचार्य आणि विभाग प्रमुख,
ग्रामीण विकास कीर्ती महाविद्यालय,
दादर मुंबई - ४०० ०२८.

जागतिकीकरण (Globalisation) हा जगातील सर्वच राष्ट्रांच्या आर्थिक, सामाजिक व्यवस्थेचा एक अटळ स्थायीभाव बनला आहे. जागतिकीकरण ही अशी स्थिती आहे की जेथे राष्ट्रांराष्ट्रांच्या सीमारेषा, आर्थिक-सांस्कृतिक खंडात्मकता, पृथकात्मकता पुसट होते. जागतिकीकरण म्हणजे सर्व जग हेच एक मुक्त बाजारपेठ बनण्याची प्रक्रिया होय. जागतिकीकरणामुळे सर्व राष्ट्रे एकमेकांच्याजवळ आली असून जग हे एक मोठे खेडे बनले आहे. The World has become a global village.

जागतिकीकरणातून जन्माला आलेल्या मुक्त अर्थव्यवस्था, आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण या अपत्यांमुळे जगातल्या सर्वच राष्ट्रांच्या आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक व्यवस्थांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून येताना दिसत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थाही जागतिकीकरण व मुक्त आर्थिक धोरण, उदारीकरण यांनी प्रभावित होणे स्वाभाविक आहे.

स्वातंत्र्योत्तर भारताने भारतीय समाजरचनेला पोषक अशी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली. सार्वजनिक व खाजगी उद्योगांचे संतुलन राखून, अर्थ नियमंत्रणे लादून, विदेशी मालांच्या आयातीवर नियंत्रण ठेवून स्थानिक उत्पादनाला संरक्षण पुरवणे, शेती व उद्यागातील दुबळ्यांना अडचणीच्या वेळी साहाय्य करणे, कल्याणकारी राज्याचा आकृतिबंध राखणे अशी प्रमुख वैशिष्ट्ये असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेची चार दशकांची वाटचाल १९९०-९१ नंतर खंडित झाली. त्या वेळी भारताचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव व केंद्रीय अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी जागतिकीकरण, मुक्त उदार अर्थव्यवस्थेचे प्रतिनिधित्व करणारा गॅट करार GATT – General Agreement on Trade and Tariff स्वीकारल्या. त्याबरोबरच जागतिक व्यापार संघटनेमध्ये सहभागी होणाऱ्या १३७ राष्ट्रांपैकी एक अशी भारताला नवी ओळख प्राप्त झाली.

जागतिकीकरणाची लक्षणे असलेले मुक्त व उदार आर्थिक धोरण स्वीकारून भारताने राष्ट्राराष्ट्रातील खुल्या व्यापाराचे सूत्र स्वीकारले. जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, गॅट करार, डंकेल प्रस्ताव यांच्यामार्फत वेळोवेळी मांडलेली बंधने, नियंत्रण थोडक्यात अशी आहेत.

१. विकसित राष्ट्रांतील नव्या तंत्रज्ञानाचा, नव्याने शोधलेल्या उत्पादनाचा अविकसित राष्ट्रांना लाभ होण्यासाठी राष्ट्रांराष्ट्रांमधील व्यापारी निर्बंध शिथील करावेत. आयातकार कमी करावा म्हणजे थोडक्यात जागतिक व्यापार संघटनेत सामील असलेल्या राष्ट्रांच्या उत्पादनाला आपल्या देशाची बाजारपेठ खुली करणे होय.

२. राष्ट्रांराष्ट्रांमध्ये खुला व्यापार व्हावा म्हणून त्यासाठी पोषक ठरणारे कायदे सदस्य राष्ट्रांनी बनवावेत. या निर्बंधाचे पालन करण्यासाठी भारताला कंपनी कायदा, कामगार कायदे, व्यापारी कायदे, बँकिंग कायदे, पेटंट अॅक्ट यात बदल करणे भाग पडले.

३. गॅट करार स्वीकारल्याने सार्वजनिक उद्योगांचा संकोच करून, सरकारी उद्योगांचे संरक्षण काढून खाजगी उद्योगांना प्रोत्साहन देणे भाग पडले. त्यामुळे सरकारी उद्योगधंदे, कंपन्या, महामंडळे यांचे खाजगीकरण करणे आवश्यक बनले.

४. शेतकरी, उद्योजक, मागासवर्गीयांना दिल्या जाणारी सरकारी सबसिडीज, अनुदाने हळूहळू बंद करणे.

५. कल्याणकारी उपक्रमांना ते फायदेशीर, किफायतशीर नसल्यामुळे कात्री लावणे.

६. जागतिक पातळीवर वैचारिक, वैज्ञानिक, तंत्रज्ञानाविषयक देवाणघेवाण खुली करून आर्थिक स्थिती उंचावणे.

७. पारंपरिक अर्थव्यवस्थेत मुक्त व्यापाराला जे जे मारक आहे त्यात दुरूस्त्या, सुधारणा करणे.

ही आणि अशी आणखी अनेक नियंत्रणे, बंधने भारताला मुक्त आर्थिक धोरणाच्या, उदारीकरणाच्या वाटचालीत स्वीकारावी लागणार. या सर्वांचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होत आहेत आणि पुढेही होणार आहेत.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम :**

सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर आणि शीतयुद्धाच्या Cold War समाप्तीनंतर जगाची राजकीय आणि आर्थिक सूत्रे बदलली. याशिवाय विज्ञान, तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे, दळणवळण साधने यांच्या विस्मयकारक विकासाने जागतिकीकरणाची प्रक्रिया वेगवान झाली. डॉ. अमर्त्य सेन यांच्या मते, जागतिकीकरण ही अटळपणे आपल्यापर्यंत आलेली प्रक्रिया असून ती स्वीकारणे भाग आहे. तिच्या विरोधी किंवा तिच्या बाजूने बोलण्यात आता अर्थच उरला नाही.

अर्थात, असे असले तरी प्रत्येक देश, प्रदेश, समाज समूह हे जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, उदारीकरण यांनी प्रभावित होत आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्था हा केंद्रबिंदू मानला तर जागतिकीकरण कितपत हितकारक आणि कितपत अहितकारक आहे हे तपासून पाहणे महत्त्वाचे आहे.

**अ. ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी जागतिकीकरणाची हितकारक बाजू :**

अनेक अभ्यासकांनी जागतिकीकरणाची हितकारक बाजू (फायदे) ग्रामीण अर्थव्यवस्थेतील दृष्टीने नमूद केले आहेत. सारांशाने हे हितकारक परिणाम पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील –

१. शेतमालाला चांगला भाव मिळाल्याने तसेच भारतीय शेतमालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाल्याने शेतकरी संपन्न होईल. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल. स्पर्धेला तोंड देण्याची क्षमता भारतीय शेतकऱ्यांमध्ये निर्माण होईल.

२. उदारीकरण, मुक्त आर्थिक धोरणामुळे भारतातील परकीय गुंतवणूक वाढेल. उद्योगांचा विकास होईल, करांच्या रूपाने आर्थिक स्थिती सुधारेल तसेच नवा रोजगारही निर्माण होईल.

३. संमिश्र अर्थव्यवस्था व कल्याणकारी भारत शासनाने आजपर्यंत शेतीला, शेतकऱ्यांना विविध सवलती, अनुदान, सबसिडी, कर्ज अल्प दरात देऊन त्याची सवय लावली. शेतकऱ्यांना सरकारने, परावलंबी किंवा पांगळे बनविले, मुक्त आर्थिक धोरणामुळे, जागतिकीकरणामुळे या सवलती बंद होत जातील. शेतकरी, कारागीर आत्मनिर्भर होतील, अधिक धडाडीने कामाला लागतील.

४. शेतकरी, कारागीर, ग्रामीण कलाकार, व्यावसायिक यांचा व्यापक जगाशी संबंध प्रस्थापित होईल. त्यामुळे कूपमंडूक वृत्ती जाऊन त्यांच्यात उद्योजकता निर्माण होईल.

५. जागतिकीकरणाने शेती व व्यावसायाशी निगडीत नव्या तंत्रज्ञानाचा प्रसार होईल. त्याच्या वापराने उत्पादन वाढेल.

६. श्री. आर्थर डंकेल यांनी प्रत्येक देशाचा पेटंट कायदा वेगवेगळा न ठेवता, गॅट राष्ट्रांच्या पेटंट कायद्यात सारखेपणा आणून पेटंटधारकाचे अधिकार वाढविले. यामुळे प्रगत राष्ट्रांकडून पेटंट हक्काद्वारे तयार होणारे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे दर्जेदार, निर्भेळ बी-बियाणे, औषधे, खते सहजपणे मिळतील.

७. कलाकसुरीच्या वस्तू, कापड यांच्या निर्यातीत वाढ होऊन कारागिरांना, कलाकारांना त्यांचा फायदा मिळेल.

**आ. ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी जागतिकीकरणाचे तोटे :**

जागतिकीकरण, उदारीकरण, मुक्त अर्थव्यवस्था ही शेतकरी, कारागीर व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने केवळ अहितकारक नसून धोकादायक, अरिष्टात्मक आहे, अशीही भूमिका अनेकांनी मांडली आहे त्यांचे मुद्दे पुढीलप्रमाणे –

१. गॅट करारावर सही करून भारताने शेती, व्यापार गुंतवणूक, सेवा, योजना, इत्यादी क्षेत्रातील निर्णय नियमनांचा हक्क गमावला. गॅट करार, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांनी बंधने स्वाकारावी लागली आणि संमिश्र-कल्याणकारी अर्थव्यवस्थेला तिलांजली दिली. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने गरीब कारागीर, अल्पभूधारक, शेतकरी यांना मिळणाऱ्या विविध सवलती, सबसिडी जवळपास बंद झाल्या. त्याचा फटका शेतकरी व कारागीरांना मोठ्या प्रमाणात बसला. बहुसंख्य शेतकऱ्यांनी शेती व्यवसायाकडे पाठ फिरवावी लागली. महागडी युरीया खते, बियाणे खरेदी करून नव्या तंत्राचा खर्च सोसून उत्पादन काढणे, नॅसले कंपनी सारख्यांच्या दुधाशी स्पर्धा करणे व भाव न मिळाल्यास कर्जाच्या दबावाने हतबल होणे त्यांच्या नशिबी आले. अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्येचाही मार्ग स्वीकारला. दुसरे म्हणजे प्रगत राष्ट्रे आपआपल्या राज्यात शेतकऱ्यांना मोठी सबसिडी देते, त्यामुळे त्याचे शेतकरी अल्पदरात शेतमाल विकू शकतात. भारतात मात्र सबसिडी राखण्यास, वाढविण्यास विरोध होतो. हे प्रगत राष्ट्रांचे धोरणही दुटप्पी आणि स्वार्थी आहे.

२. प्रगत राष्ट्रांच्या अर्थसहाय्यावर चालणारा व त्याच्या नियमांबरहुकूम धोरणे ठरविणारा भारत देश हा जागतिक वेठबिगार बनेल. प्रगत राष्ट्रांचे बाहुले बनेल. प्रगत राष्ट्रांच्या निरर्थक, टाकाऊ, चंगळवादी वस्तू, अन्न पदार्थ, पेय इत्यादी उत्पादने भारतासारख्या बाजारपेठामध्ये आणून विकली जातील. स्वातंत्र्यानंतर भारत पुन्हा या नववसाहरवादाच्या कात्रीत सापडेल.

३. जागतिकीकरण मुक्त आर्थिक व्यवस्था यामुळे शासकीय सहभाग कमी होतो. खाजगीकरणाला चालना मिळते. अर्थ नियंत्रणे परवाने यांना स्थान उरत नाही. परिणामी सार्वजनिक उद्योग बंद पडणे, रोजगार वाढविणाऱ्या शासकीय खर्चात कपात करणे इत्यादी अनेक मार्गांनी ग्रामीण बेरोजगारीचे प्रमाण वाढू लागले आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे काही व्यवसाय इतिहासजमा झाले. सधन, मोठ्या शेतकऱ्यांनी यांत्रिकीकरणाचा स्वीकार केल्यामुळे वेतनावर काम करणाऱ्या शेतमजुरांची संख्या कमी झाली.

४. खाजगीकरणाच्या प्रक्रियेत कंत्राटी अधिकारी, सेवक, शिक्षक, नोकरदार नेमणे त्यांना नोकरीच्या व सामाजिक सुरक्षेच्या लाभांपासून हळूहळू वंचित करणे, कामगार कल्याणाचा तरतुदींकडे दुर्लक्ष करणे यामुळे संघटित क्षेत्रातील सुरक्षित म्हणवल्या जाणाऱ्या नोकरदारांना धक्का बसला आहे.

५. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे अधिकाधिक परकीय उद्योजक भारतात औद्योगिक गुंतवणूक करीत आहे. परंतु उद्योग निर्मितीच्या प्रमाणात रोजगार निर्माण होत नाही.

६. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत ग्रामीण पर्यावरण, निसर्ग त्यावर अवलंबून असणारे यांनाही धोका पोहचतो.

७. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विदेशी अन्न धान्य, दूध, दुग्धजन्य पदार्थ भारतात येऊ लागले आहे. त्यांची स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांना शक्य नसल्याने शेती व शेतीपूरक व्यवसाय नाहीसे होतील. जमिनी विकून मजुरी करावी लागेल.

८. जागतिकीकरणाने मोठी राष्ट्रे व विकसनशील राष्ट्रे यांच्यातील तफावत वाढेल. विकसनशील देशांची पिळवणूक होईलच त्याचबरोबर भारतातील प्रादेशिक विषमता, ग्रामीण नागरी विषमता वाढेल.

९. ग्रामीण भागात शेतमालाची निर्यात करून अत्यंत सधन शेतकऱ्यांचा वर्ग निर्माण झाला त्यांचे राहणीमान उंचावले. मात्र बहुसंख्य खेडुतांच्या राहणीत फारसा फरक पडला नाही. ग्रामीण वर्गामधील अंतरही वाढले. विषमता वाढली. ग्रामीण भागातील समानतेवर आधिरत एकसंधता कमी होऊ लागली.

१०. जागतिक बँक नाणेनिधीच्या संरचनात्मक व पायाभूत सुधारणा कार्यक्रमांमुळे आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका देशांमधील कोट्यावधी लोकांना विशेषत: स्त्री कामगारांना फार मोठी झळ बसली हे अभ्यासाअंती दिसून आले.

जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था ही गरीब ग्रामीण भागांसाठी काही सुधारणा केल्यास उपयोगी हितकारक ठरू शकते अशा आशावादी मताचेही काही तज्ज्ञ आहेत.

उदारीकरण करताना ते टप्प्याटप्प्याने करावे, गोरगरीब, लहान शेतकरी, शेतमजूर, लहान व्यावसायिक यांना कमीतकमीत हादरा बसेल हे पाहिले जावे. जागतिकीकरण, उदारीकरणाचे अधिकाधिक लाभ गरीब वंचितांना करून देण्यासाठी व्यापक पातळीवर चर्चा, मंथन होणे आवश्यक आहे. जागतिकीकरण टाळता येणे शक्य नसले तरीही त्याची अनर्थकारकता कमी करण्याचे प्रयत्न आवश्यक आहेत.

डॉ. अमर्त्य सेन म्हणतात, आपले डबके हेच आदर्श जग मानण्याची वृत्ती आपण सोडली पाहिजे. जागतिकीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेवर समाजव्यवस्थेवर निश्चित आघात केले आहेत. या समस्यांवर मात करता येईल. जागतिकीकरणाला चालना देताना भारतीय मनुष्यबळाला वैचारिक, आर्थिक दृष्टीने सशक्त बनविण्यासाठी जागतिकीकरणाच्या रेट्यात वाहून जाणाऱ्यांना तसेच स्त्रियांना आधार देण्यासाठी त्यांच्या क्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आपल्या हातात आहे. डॉ. अमर्त्य सेन आशावादी गटातील असले तरी सध्या तरी जागतिकीकरणाचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील परिणाम प्रामुख्याने निराशाजनकच दिसत आहे.

**ग्रामीण भारतातील पर्यायी आर्थिक विकास :**

ग्रामीण भागातील प्रचलित विकासातील त्रुटी कमी करण्यासाठी पर्यायी, निकोप, चिरंजीवी विकासाची कल्पना मांडली गेली. पर्यायी ग्रामीण विकासाचे काही मूलभूत मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. जमीन, जंगल, पाणी ही ग्रामीण भागातील महत्त्वाची नैसर्गिक संसाधने वरिष्ठांच्या मक्तेदारीपासून वाचविली पाहिजेत. या बाबतच्या कायद्याची काटेकोरपणे अमंलबजावणी झाली पाहिजे. त्यांच्यावर स्थानिकांचा अधिकार व मालकी हवी.

२. मक्तेदारी, शोषण टाळण्यासाठी वंचितांना एकत्र करून सामूहिक सहकारी शेतीला चालना द्यायला हवी. माओ त्से तुंग यांनी चीनचा कायापालट ग्रामीण पुनर्रचना सामूहिक शेती याच प्रमुख आधारावर केला.

३. जमीन, पाणी ही ग्रामविकासाची महत्त्वाची साधने आहेत. जमीनीचा कस राखणे, जमिनीखालील पाण्याची पातळी वाढविणे. पाणलोट क्षेत्र विकसित करणे यासाठी कमी खर्चिक श्रमदानावर आधारीत असे प्रयोग करणे.

४. ग्रामपंचायती, ग्रामसभा बळकट करून त्यांना गावच्या विकासाचा निर्णय व उपक्रम राबविण्याची अधिकाधिक संधी देणे.

५. शेतीसाठी महागडी, विदेशी, प्रदूषणकारक कीटकनाशके, तंत्रे, यंत्रे वापरण्याऐवजी स्थानिक पातळीवर तयार केलेली साधी व सुसंगत पर्यावरण कीटकनाशके, खते यांचा वापर करणे.

६. नैसर्गिक साधनसामुग्रीची हानी न होता त्याचा विकास कार्यासाठी वापर करणे, असा विकास हा चिरकाल टिकणारा विकास Sustainable Development म्हणता येईल.

७. पारंपारिक लघुउद्योग, कुटीरउद्योग यांना चालना देणे व गावचा माणूस खेड्यांत स्वयंपूर्ण बनेल हे पाहणे.

८. सहकारी उद्योगधंदे, पतसंस्था यांना चालना देणे, त्यांच्यातील मर्यादा दूर करण्याचा प्रयत्न करणे.

९. शासकीय अवलंबन दूर करून सर्व ग्रामस्थांद्वारे सहभागी विकासाला चालना देणे.

१०. सहिष्णुता, सभ्यता, पुरोगामित्व, न्याय, समानता, बंधुता, सहकार्य, ऐक्य ही मूल्ये बाळगणारा मानव निर्माण करणे, हे पर्याय विकासाचे सूत्र आहे. त्यासाठी शिक्षणप्रसार, ज्ञानविस्तार, ग्रामस्थांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे.

११. पर्यायी विकासात स्त्रियांची भूमिका महत्त्वाची असण्यासाठी त्यांचे आर्थिक, सामाजिक, राजकीय सबलीकरण आवश्यक आहे.

१२. प्रचलित विकासात आर्थिक वाढ ही महत्त्वाची आहे. त्यासाठी जैवमालाच्या (Biomass) वाढीव व वैविध्यपूर्ण उत्पादनाला चालना देऊन ग्रामीण समाजाच्या अन्न, चारा, इंधन इत्यादी मूलभूत गरजा पूर्ण करणे, जैवमालाच्या उत्पादनाकरिता आवश्यक पाणी, ऊर्जा व भांडवल यांची खात्री ग्रामस्थांना देणे व सौरऊर्जेसारख्या पर्यायी, स्वस्त व चिरंजीवी ऊर्जास्रोतांचा विकास करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची**

(1) G. K. Chadha - WTO and The Indian Economy,Deep & Deep Publications Pvt. Ltd. F-159, Rajouri Garden, New Delhi – 110 027.

(2) R. K. Lekhi, Joginder Singh – Agricultural Economics,Kalyani Publishers, 1/1, Rajinder Nagar, Ludhiana – 141 008.

(3) Debendra Kumar Das – Globalisation and Development, Experiences and Challenges,Deep & Deep Publications Pvt. Ltd. F-159, Rajouri Garden, New Delhi – 110 027.

(4) वि. स. पागे – बेकारी निर्मूलनातून ग्रामविकास यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई प्लॉट नं. ७ व ९ जन.,जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.